# मित्रांच्या पैशातून घडला ‘भिल’ बोलीतला पहिला चित्रपट!

पुणे, दि . १६ जानेवारी २०२६ : “आम्ही काही मित्रांनी मिळून पैसे गोळा केले. ही मोठी रिस्क होती, पण आमची जिद्द पक्की होती आणि त्यातून ‘कडकनाथ‘ हा चित्रपट तयार झाला," असे ‘ कडकनाथ’ चित्रपटाचे दिग्दर्शक कौशिक गरासिया यांनी सांगितले.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) आज भारतीय चित्रपट विभागामध्ये 'कडकनाथ' हा चित्रपट दाखवण्यात आला. त्यानंतर त्या चित्रपटाचे दिग्दर्शक गरासिया बोलत होते. ते म्हणाले, “‘भिल’ या आदिवासी बोलीभाषेत तयार झालेला हा भारतातील पहिलाच मोठा चित्रपट आहे. हा चित्रपट केवळ मनोरंजनासाठीच नाही, तर ती एक एक जिद्द आहे.” ते म्हणाले , की अत्यंत कमी बजेटमध्ये तांत्रिक दर्जा टिकवून हा सिनेमा पूर्ण करणे हे टीमसमोर मोठे आव्हान होते. मात्र मित्रांची साथ आणि बोलीभाषेला जागतिक स्तरावर घेऊन जाणे, ही जिद्द होती त्यातून हा चित्रपट साकारला. ‘भिल’ ही भाषा बोलणारे अनेक प्रदेशांमध्ये लोक आहेत. मात्र या भाषेला तेवढे महत्त्व मिळालेले नाही. अनेकांना ही भाषा आहे हे नाहीत नाही. त्यामुळेच या भाषेत चित्रपट तयार कण्याचे ठरवले. या चित्रपटातून ‘भिल’ संस्कृती पुढे आणण्याचा प्रयत्न आहे. या भाषेतील चित्रपट प्रेक्षकांना समजेल की नाही हे आव्हान होते, मात्र ते आव्हान पेलण्याचा प्रयत्न केला आहे.

चित्रपटाची कथा गुजरातच्या दुर्गम आदिवासी भागात घडते, जिथे अचानक रहस्यमय मृत्यू सत्र सुरू होतं. नरबळी आणि जातीय अत्याचार, या विषयाभोवती फिरणारा हा रहस्यमय चित्रपट आहे.

## इम्बू : श्रद्धा आणि डिजिटल जगातील संघर्ष मांडणारा तुळू चित्रपट

दक्षिण भारतातील श्रद्धा, विश्वास, परंपरा, दैवी शक्ती, नृत्य आणि संगीत यांच्या सांस्कृतिक प्रवाहात आधुनिक तंत्रज्ञान विशेषतः मोबाईल फोन मानवी जीवनावर कसा प्रभाव टाकतो, याचे प्रभावी चित्रण करण्यात आलेला ‘इम्बू’ हा तुळू भाषेतील चित्रपट आज २४ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी प्रदर्शित करण्यात आला. त्यानंतर दिग्दर्शक शिवध्वज शेट्टी बोलत होते. ते म्हणाले, “निसर्गरम्य गावाकडील जीवन, त्यातील साधेपणा आणि माणसांमधील भावनिक नाती या पार्श्वभूमीवर चित्रपटाची मांडणी करण्यात आली आहे.

मोबाईल फोनच्या वाढत्या वापरामुळे कौटुंबिक नातेसंबंध, मानसिक समतोल आणि माणूस एका कृत्रिम जगात अडकून आपले वास्तविक आयुष्य कसे गमावतो, हे सांगणारा हा चित्रपट आहे.”

इम्बू म्हणजे आशीर्वाद. चित्रपटातील मुख्य पात्र बालण्णा हा गावातील एका प्रतिष्ठित पुजाऱ्याला यक्षगान पाहण्याच्या निमित्ताने नव्या डिजिटल दुनियेत प्रवेश करायला लावतो आणि त्या माध्यमातून त्याची कशी वेगळी फसवणूक होते, हे कथानकाच्या माध्यमातून उलगडले जाते. श्रद्धा आणि तंत्रज्ञान यांच्यातील संघर्ष हा चित्रपटाचा केंद्रबिंदू ठरतो.

**महिला स्वातंत्र्याभोवती फिरणारा 'व्हिक्टोरिया'**

व्हिक्टोरिया या चित्रपटाची कथा एका युवतीभोवती फिरते, तिला एका दिवसासाठी धार्मिक विधीचा कोंबडा सांभाळावा लागतो व त्याचवेळी तिला आपल्या आंतरधार्मिक नात्याचा सामनाही करावा लागतो.
मल्याळी चित्रपट 'व्हिक्टोरिया'चे आज पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात झाले. त्यानंतर दिग्दर्शिका शिवरंजिनी जे आणि छायाचित्रकार आनंद रवी यांनी संवाद साधला.

चित्रपटाची मूळ संकल्पना स्पष्ट करताना शिवरंजिनी म्हणाल्या, "एका स्थानिक पार्लरमध्ये आम्ही बसलो असताना एक कोंबडा पाहीला आणि त्यातून ही कथा सुचली. हा चित्रपट केरळ राज्य चित्रपट विकास महामंडळाकडून निर्मिती अनुदान मिळाल्याने शक्य झाला. त्या म्हणाल्या, "स्त्रीचे स्वातंत्र्य, आणि तिच्या अस्तित्वाची जाणीव, हा या चित्रपटाचा विषय आहे."